274/10306 **पावती** Original/Duplicate
Monday,October 27 ,2025 नोंदणी क्रं. :39म
5:34 PM Regn.:39M

पावती क्रं.: 14034 दिनांक: 27/10/2025

गावाचे नाव: **दाभा**
दस्तऐवजाचा अनुक्रमांक: **नगन(ग्रा)-10306-2025**
दस्तऐवजाचा प्रकार : **विक्रीपत्र**
सादर करणाऱ्याचे नाव: **मुकींदा शंकरराव जोगेकर**

| | |
|---|---|
| नोंदणी फी | रु. 30000.00 |
| दस्त हाताळणी फी | रु. 1040.00 |
| पृष्ठांची संख्या: 26 | |
| एकूण: | रु. 31040.00 |

DELIVERED

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट,सूची-२ अंदाजे
5:53 PM ह्या वेळेस मिळेल.

सह.दु.नि.नागपूर 10 (ग्रामीण)
सह दुय्यम निबंधक
नागपूर क्रं. १०

बाजार मुल्य: रु.1830000 /-
मोबदला रु.3750000/-
भरलेले मुद्रांक शुल्क : र. 262500/-

1) देयकाचा प्रकार: DHC रक्कम: रु.1040/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 1025275013928 दिनांक: 27/10/2025
बँकेचे नाव व पत्ता:
2) देयकाचा प्रकार: eChallan रक्कम: रु.30000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH010693560202526E दिनांक: 27/10/2025
बँकेचे नाव व पत्ता:

2

# CHALLAN
## MTR Form Number-6

| GRN | MH010698560202526E | BARCODE | | Date | 27/10/2025-15:38:08 | Form ID | 25.1 |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| **Department** Inspector General Of Registration | | **Payer Details** | |
| **Type of Payment** Stamp Duty and Registration Fee together | | **TAX ID / TAN (If Any)** | |
| | | **PAN No.(If Applicable)** | |
| **Office Name** NGR_NAGPUR NO10 RURAL SUB REGISTRAR | | **Full Name** | MUKINDA S JOGEKAR |
| **Location** NAGPUR | | | |
| **Year** 2025-2026 One Time | | **Flat/Block No.** | C.T.S. NO. 48 |
| **Account Head Details** | **Amount In Rs.** | **Premises/Building** | |
| 0030046401 Stamp Duty | 262500.00 | **Road/Street** | MOUZA DABHA |
| 0030063301 Registration Fee | 30000.00 | **Area/Locality** | NAGPUR |
| | | **Town/City/District** | |
| | | PIN | 4 4 0 0 2 3 |
| | | **Remarks (If Any)** | |
| | | SecondPartyName=UDAY R RINGE~ | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | **Amount In** | Two Lakh Ninety Two Thousand Five Hundred Rupees O |
| **Total** | 2,92,500.00 | **Words** | nly |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Payment Details** STATE BANK OF INDIA | | **FOR USE IN RECEIVING BANK** | | |
| **Cheque-DD Details** | | Bank CIN | Ref. No. 00040572025102723861 | CK00LQCOY9 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date 27/10/2025-15:24:39 | Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | STATE BANK OF INDIA | |
| Name of Branch | | Scroll No. , Date | Not Verified with Scroll | |

Department ID : Mobile No. : 0000000000

**NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.**

सदर चलन केवल दुय्यम निबंधक कार्यालयात नोदंणी करावयाच्या दस्तांसाठी लागु आहे. नोदंणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागु नाही.

नगन-१० 
१०३०६ / २०२५
१ / २६

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR NAGPUR NO.10 — सह दुय्यम निबंधक नागपूर क्र. १०



Print Date 27-10-2025 03:39:56

3

| | |
|---|---|
| नगन-१० | |
| १०३०६ | २०२५ |
| २ | २६ |

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR NAGPUR NO.10
सह दुय्यम निबंधक नागपूर क्र. १०

मा. सह-दुय्यम निबंधक नोंदणी कार्यालय नागपूर हद्दीतील

# स्थावर मालमत्तेचे

# विक्रीपत्र

किंमत रूपये 37,50,000/-

(अक्षरी - सदोतीस लाख पन्नास हजार रूपये फक्त)

बाजारभाव किंमत रूपये 18,30,000/-

विक्रीपत्र लिहुन घेणार :- १. डॉ. मुकींदा शंकरराव जोगेकर
वय - 52 वर्षे, व्यवसाय - नौकरी,
पॅन क्रमांक ADXPJ6262D, आधार क्रमांक 8953 8842 1309.
२. डॉ. अलका मुकींदा जोगेकर
वय - 46 वर्षे, व्यवसाय - नौकरी,
पॅन क्रमांक AWMPJ4427E, आधार क्रमांक 9211 6048 2287.
दोघेही रा. वॉर्ड क्रमांक 21, संत्रा मार्केट जवळ, आय.यु.डी.पी., काटोल, तालुका काटोल, जिल्हा नागपुर, महाराष्ट्र - 441302.

विक्रीपत्र लिहुन देणार :- १. श्री उदय रामराव रिंगे
वय - 62 वर्षे, व्यवसाय - सेवानिवृत्त,
पॅन क्रमांक AEGPR8585P, आधार क्रमांक 3329 3950 8768.
२. सौ. भारती उदय रिंगे
वय - 55 वर्षे, व्यवसाय - गृहिणी,
पॅन क्रमांक ALOPR5301C, आधार क्रमांक 6888 3444 4104.
दोघेही रा. बी-2/157, श्रावण अपार्टमेंट, वाल्मीकी नगर, गोकुलपेठ, नागपुर, महाराष्ट्र - 440010.

आज दिनांक 27/10/2025 ला हे विक्रीपत्र खालील प्रमाणे लिहुन देण्यात येते ते येणेप्रमाणे :

नगन-१०
१०३०६ / २०२५
२ / ९६

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR NAGPUR NO.10
सह दुय्यम निबंधक नागपूर क्र. १०

खालिल परिशिष्टात वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सर्व प्रथम श्री समीर सतीश हरताळकर यांनी श्रीमती उषादेवी मोहन मुरारका व श्रीमती गायत्रीदेवी बालगोविंद शिवहरे तर्फे आममुखत्यार डॉ. मोहन रामनिवास मुरारका (डायरेक्टर - मुरारका शिवहरे हाऊसिंग कॉम्प्लेक्स प्रा. लि.) यांचेकडून दुय्यम निबंधक, नागपुर क्रमांक 11 यांचे कार्यालयात दिनांक 10/11/1994 रोजी अॅड. बुक क्रमांक 1 चे व्हॉल्युम क्रमांक 957 मध्ये पान क्रमांक 115 ते 116 वर दस्त क्रमांक 7375 (छा) अन्वये नोंदणीकृत केलेल्या विक्रीपत्राव्दारे खरेदी केली आहे. श्री समीर सतीश हरताळकर यांनी या स्थावर मालमत्तेबाबत सौ. भारती उदय रिंगे यांचे नावे दुय्यम निबंधक, नागपुर क्रमांक 2 यांचे कार्यालयात दिनांक 08/09/2003 रोजी दस्त क्रमांक 4526/2003 अन्वये आममुखत्यार पत्र नोंदणीकृत करून दिले व या आममुखत्यार पत्राव्दारे सौ. भारती उदय रिंगे यांना या मालमत्तेशी सबंधित विक्रीचे सर्व अधिकार प्रदान केले आहेत. श्री समीर सतीश हरताळकर तर्फे आममुखत्यार म्हणून सौ. भारती उदय रिंगे यांनी या मालमत्तेचे विक्रीचा करारनामा दिनांक 07/01/2021 रोजी लिहून देणार क्रमांक 1 व 2 यांचे नावे लिहून दिला असून हा विक्रीचा करारनामा दिनांक 07/01/2021 रोजी सह-दुय्यम निबंधक वर्ग 2, नागपुर क्रमांक 4 यांचे कार्यालयात दस्त क्रमांक 184/2021 अन्वये नोंदणीकृत केलेला आहे. तद्नंतर श्री समीर सतीश हरताळकर तर्फे आममुखत्यार म्हणून सौ. भारती उदय रिंगे यांनी या मालमत्तेचे विक्रीपत्र दिनांक 14/03/2022 रोजी लिहून देणार क्रमांक 1 व 2 यांचे नावे लिहून दिले असून हे विक्रीपत्र दिनांक 14/03/2022 रोजी सह-दुय्यम निबंधक वर्ग 2, नागपुर क्रमांक 4 यांचे कार्यालयात दस्त क्रमांक 2522/2022 अन्वये नोंदणीकृत केले आहे. मात्र दिनांक 14/3/2022 चे विक्रीपत्रामध्ये तांत्रिक चुक आढळून आल्यामुळे या विक्रीपत्राचे चुक दुरूस्तीपत्र सह-दुय्यम निबंधक वर्ग 2, नागपुर क्रमांक 4 यांचे कार्यालयात दिनांक 17/03/2022 रोजी दस्त क्रमांक 2649/2022 अन्वये नोंदणीकृत करण्यात आले आहे. सदर भुखंड लिहून देणार यांचेच मालकी कब्जात असुन सर्व सरकारी निमसरकारी कार्यालयांचे रेकॉर्डवर वंशोपभोग्य हस्तांतरणीय हक्काने लिहून देणार यांचे नांवे दर्ज आहे.

लिहून देणार यांना त्यांचे व त्यांचे परीवाराचे उपयोगाकरीता पैशाची आवश्यकता असल्यामुळे सदर भुखंड योग्य व्यक्तीस व योग्य विक्रीभावाचे मोबदल्यात विकण्याचा लिहुन देणार यांनी विचार केला. लिहुन घेणार यांनी खालिल परीशिष्टात वर्णन केलेली स्थावर मालमत्ता विकत घेण्याचा मानस प्रदर्शित केल्यामुळे आपसात विचार विनीमय व चर्चा करून लिहून देणार व लिहून घेणार यांचेमध्ये या मालमत्तेचा एकुण रूपये 37,50,000/- (अक्षरी - सदोतीस लाख पन्नास हजार रूपये फक्त) मध्ये सौदा पक्का झाला. त्या विक्रीचे मोबदल्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे -

नगन - १०
१०३०६ / २०२५
४ / २६

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR, NAGPUR NO. 10
सह दुय्यम निबंधक नागपूर क्र. १०

## मोबदल्याचा तपशिल

रूपये 3,75,000/- ( अक्षरी - तीन लाख पंच्याहत्तर हजार रूपये फक्त) श्री उदय रामराव रिंगे यांना लिहून घेणार यांचेकडून ॲक्सीस बँक लिमीटेड, शाखा काटोल, नागपुर अन्वये दिनांक 27/10/2025 रोजी जारी केलेल्या आरटीजीएस (युटीआर क्रमांक - UTIBR52025102700359490 ) व्दारे प्राप्त झाले आहेत.

रूपये 3,75,000/- ( अक्षरी - तीन लाख पंच्याहत्तर हजार रूपये फक्त) सौ. भारती उदय रिंगे यांना लिहून घेणार यांचेकडून ॲक्सीस बँक लिमीटेड, शाखा काटोल, नागपुर अन्वये दिनांक 27/10/2025 रोजी जारी केलेल्या आरटीजीएस (युटीआर क्रमांक - UTIBR52025102700359666 ) व्दारे प्राप्त झाले आहेत.

रूपये 15,00,000/- ( अक्षरी - पंधरा लाख रूपये फक्त) श्री उदय रामराव रिंगे यांना लिहून घेणार यांचेकडून पीएनबी हाऊसिंग फायनांस लिमिटेड, नागपुर यांचेकडून कर्जाव्दारे प्राप्त केलेल्या रकमेतून पंजाब नॅशनल बॅंक, के. जी. मार्ग, नवी दिल्ली अन्वये दिनांक 27/10/2025 रोजी जारी केलेल्या चेक क्रमांक 190209 व्दारे प्राप्त झाले आहेत.

रूपये 15,00,000/- ( अक्षरी - पंधरा लाख रूपये फक्त) सौ. भारती उदय रिंगे यांना लिहून घेणार यांचेकडून पीएनबी हाऊसिंग फायनांस लिमिटेड, नागपुर यांचेकडून कर्जाव्दारे प्राप्त केलेल्या रकमेतून पंजाब नॅशनल बॅंक, के. जी. मार्ग, नवी दिल्ली अन्वये दिनांक 27/10/2025 रोजी जारी केलेल्या चेक क्रमांक 190208 व्दारे प्राप्त झाले आहेत.

**एकुण रूपये 37,50,000/- (अक्षरी - सदोतीस लाख पन्नास हजार रूपये फक्त)** लिहून देणार यांना लिहून घेणार यांचेकडून प्राप्त झाले आहेत. आता लिहून देणार यांना लिहून घेणार यांचेकडून काही घेणे बाकी राहीलेले नाही व रकमेचे घेण्याबद्दल उजर अथवा तक्रार राहीलेली नाही, हीच संपुर्ण मोबदला मिळाल्याची पावती आहे.

1) सदरहु मिळकत लिहून देणार यांची स्वकष्टार्जीत पैशाने खरेदी केलेली स्वतंत्र मालमत्ता असून या विक्री केलेल्या भुखंडावर लिहुन देणार यांनी कोणत्याच प्रकारचा बोझा हक्क निर्माण केलेला नाही किंवा इतर कोणाशीही कोणत्याच प्रकारचा करार किंवा इतर कोणतेही व्यवहार केलेले नाही व इतर कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोझा निर्माण केलेला नाही. सदरहू मालमत्ता कोणत्याही वारसा हक्क संबंधात नाही.

नगन-१० | १०३०६/२०२५ | ५/२६

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR NAGPUR NO. 10

असे बोझा अगर इतर हक्क दिसुन आल्यास व त्यामुळे लिहून घेणार यांचे नुकसान झाल्यांस होणा-या नुकसानाची परतफेड करण्याची जबाबदारी संपुर्णतः विक्री करून देणार यांचेवर राहील. लिहून देणार यांना हा भुखंड लिहून घेणार यांना विक्री करण्याचा पुर्ण अधिकार आहे. वरील सर्व बाबींची खात्री/शहनिशा करूनच लिहून घेणार यांनी ही मालमत्ता जसा आहे तसा तत्वावर विकत घेतली आहे

2) सदरहु भुखंडावरील सर्व प्रकारचे कर, सेस वायदा इत्यादी लिहुन देणार यांनी आजतागायत भरलेले आहेत. तसेच या विक्रीपत्रानंतर या भुखंडावरील टॅक्स, कर भरण्याची जबाबदारी लिहुन घेणार यांची राहील. सदरहु मालमत्तेवर विक्रीपत्र नोंदणीपुर्वीचे टॅक्स वा बोझा आढळून आल्यांस त्याचा भरणा करण्याची जवाबदारी लिहून देणार यांचीच राहील. परंतू विक्रीपत्रानंतर कोणत्याही नविन धोरणामुळे विक्रीपत्र नोंदणीपुर्वीचा अतिरीक्त कर/बोझा मागण्यात आला तर तो भरण्याची जवबाबदारी लिहून घेणार यांचीच राहील.

3) या विक्रीपत्राचे आधारे नागपुर महानगर पालिका/नागपुर सुधार प्रन्यास/ पटवारी/सिटी सर्व्हे व ईतर सरकारी निमसरकारी कार्यालयांचे रेकॉर्ड मध्ये लिहुन घेणार यांनी आपले नांव स्वखर्चाने दाखल करून घ्यावे आणि त्यावरील येणारा कर त्यांनी स्वतः भरावा.

4) ज्या ज्या सरकारी निमसरकारी कार्यालयांचे रेकॉर्डवर खरेदीदाराचे नांव दाखल करावे लागते, त्या त्या कार्यालयात करावयाच्या सर्व प्रकारच्या अर्जावर, निवेदनांवर, शपथपत्रांवर लिहुन देणार हे सह्या करतील आणि लिहुन घेणार यांचे नांव दर्ज करण्याकरीता लागणारी सर्व प्रकारची मदत लिहुन देणार करतील. मात्र याकरीता लागणारा खर्च लिहुन घेणार हे करतील.

5) या संपुर्ण भुखंडाचा निर्दोष खुला मालकी ताबा लिहुन देणार (विक्रेता) यांनी लिहुन घेणार (खरेदीदार) यांना आज रोजी दिला आहे व लिहुन घेणार यांनी स्विकारला आहे. सदरहु भुखंडाचे मोक्यावर मोजमाप योग्य असून याची शहनिशा लिहून घेणार यांनी केलेली आहे.

6) या मिळकतीवर कुठल्याही न्यायालयात, कुठल्याही कायद्यांतर्गत अथवा मालकी हक्कासंबंधी कुठलेही प्रकरण न्याय प्रविष्ट नाही किंवा कुठल्याही न्यायालयाचा सदर मालमत्ता विकणे संबंधी स्थगनादेश नाही. याची खात्री खरेदीदाराने आपल्या स्तरावर विविध माध्यमातून करून घेतली आहे.

नगन-१०
१०३०६ / २०२५
६ / २६

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR NAGPUR NO.10
सह दुय्यम निबंधक नागपूर क्र. १०

7) सदरहु मिळकत राज्य शासनाचे अथवा केंद्र शासनाच्या कुठल्याही प्रस्तावित योजनेत अधिग्रहीत/आरक्षित नाही किंवा नागपुर महानगर पालिका अथवा नागपूर सुधार प्रन्यास यांचे प्रस्तावित योजनेत अधिग्रहीत/आरक्षित नाही किंवा प्रस्तावित नाही, अशी कुठलीही नोटीस लिहून देणार यांना आजपर्यन्त प्राप्त झालेली नाही. विक्रीपत्र नोंदणीनंतर वर नमूद कोणत्याही संस्थेचे अधिग्रहण प्रस्तावित झाल्यांस कोणताही मोबदला देण्यांस लिहून देणार बाध्य नाही. मात्र अशा अधिग्रहणातून लिहून घेणार यांना शासनाकडून कोणताही मोबदला प्राप्त झाल्यांस त्यावर फक्त लिहून घेणार यांचा हक्क व अधिकार राहील.

8) उपरोक्त लिखीत विक्रीपत्राच्या परिशिष्टात केलेले स्थावर मालमत्तेचे वर्णन बरोबर व योग्य आहे. भविष्यात सदर्हु विक्रीपत्रामध्ये कुठलीही चुक आढळल्यास हे विक्रीपत्र किंवा हा विक्रीव्यवहार रद्द समजल्या जाणार नाही व त्याबाबत दुरूस्तीपत्र करणे आवश्यक झाल्यास लिहुन देणार हे बिना मोबदला आवश्यक कागदोपत्री व दस्तऐवजावर सही देतील. अशा दुरूस्तीपत्राला लागणारा खर्च लिहून घेणार हेच करतील.

9) या भुखंडाचे मालकी संबंधीचे सर्व मुळ कागदपत्र, विक्रीपत्र आणि इतर दस्त जे लिहुन देणार यांचे ताब्यात आहेत ते सर्व मुळ कागदपत्र/सत्य प्रतिलिपी लिहून देणार यांनी लिहुन घेणार यांना विक्रीपत्र निष्पादनप्रसंगी दिले आहेत.

10) सदरहु विक्रीपत्राच्या नोंदणीकरीता लागणारा खर्च जसे मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, वकील फी व ईतर किरकोळ खर्च खरेदीदार यांनी केलेला आहे.

11) सदरहु विक्रीपत्रामुळे लिहून देणार यांना आयकर, कॅपीटल गेन टॅक्स भरावे लागल्यास त्याचा भरणा लिहून देणार हे स्वतः करतील, लिहून घेणार यांना अतिरीक्त रकमेची मागणी करणार नाही.

12) सदरहु भुखंडावरील विकास कराचा भरणा नागपुर सुधार प्रन्यास, नागपुरमध्ये केल्यांनतर इमारत अभियंता (पश्चिम), नागपुर सुधार प्रन्यास, नागपुर यांनी जारी केलेले नियमितीकरण पत्र क्रमांक बी.ई(डब्ल्यु)6738, दिनांक 18/02/2022 अन्वये प्राप्त झाले आहे. या नियमितीकरण पत्रानुसार सदरहु भुखंडाचे एकुण क्षेत्रफळ 139.293 चौरस मिटर इतके घोषित करण्यात आले आहे. शासनाव्दारे कोणत्याही धोरणात बदल केल्यामुळे जर विकास कराची अतिरीक्त रक्कम भरावी लागल्यांस तर ती रक्कम भरण्याचे लिहून घेणार यांनी कबुल केले आहे.

नगन-१०
१०३०६/२०२५
6 / २६

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR NAGPUR NO. 10
सह दुय्यम निबंधक नागपूर क्र. १०

13) सदरहु मौजा - दाभा, त.सा.क्र. 7 येथिल खसरा क्रमांक 137/2, 137/4 च्या जमिनीमधील भुखंड क्रमांक 62 ची जमिन मा. अप्पर तहसिलदार, गैरकृषी कर आकारणी क्रमांक 5, नागपुर यांचे रा.मा.क्र. 1182/एन.ए.पी.34/2022-2023 मधील दिनांक 21/11/2022 रोजी पारीत आदेशानुसार गैरकृषी करण्यात आलेली आहे.

## विक्री केलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन

नागपुर सुधार प्रन्यास व नागपुर महानगर पालिकेचे हद्दीतील मौजा - दाभा, तलाठी साझा क्रमांक 7, वॉर्ड क्रमांक 68, तालुका नागपूर शहर व जिल्हा नागपूर येथील खसरा क्रमांक 137/2, 137/4 च्या जमिनीमध्ये मुरारका शिवहरे हाऊसिंग कॉम्प्लेक्स प्रा. लि. नी पाडलेल्या लेआऊट मधील भुखंड क्रमांक 62 याची लांबी उत्तर-दक्षिण 15.24 मिटर व रुंदी पुर्व-पश्चिम 09.14 मिटर, असे याचे एकुण क्षेत्रफळ 139.293 चौरस मिटर आहे. याचा नागपुर महानगर पालिका घर क्रमांक 1119/61+62 हा असून सिटी सर्व्हे रेकॉर्डप्रमाणे शिट क्रमांक 205/61 व 244/51 आणि नगर भुमापन क्रमांक 48 व 49 हा आहे.

याची चतुःसिमा :-

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | भुखंड क्रमांक 61. |
| पश्चिमेस | - | भुखंड क्रमांक 63. |
| उत्तरेस | - | भुखंड क्रमांक 86. |
| दक्षिणेस | - | 9.00 मिटर रुंदीचा रोड. |

या चतुःसिमेच्या आतील भुखंड क्रमांक 62 ची खुली जागा हिस्सापुर्ण लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना या विक्रीपत्राव्दारे विकलेली आहे. आता लिहून घेणार हे या भुखंड क्रमांक 62 चे एकमेव, स्वतंत्र व निर्विवाद मालक झाले आहेत.

नगन - १०
१०३०६ / २०२५
८ / २६
SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR NAGPUR NO.10
सह दुय्यम निबंधक नागपूर क्र. १०

आता सदर मिळकतीवर लिहून देणार अथवा त्यांचे वारसदार, कायदेशिर प्रतिनीधी व इतर संबंधितांचा अथवा इतर कोणाचा कोणतेही प्रकारचा हक्क, दावा, हितसंबंध व मालकी हक्क वगैरे बिलकुल राहीलेला नाही. आजपासून लिहून घेणार हे या विक्री केलेल्या मिळकतीचे संपुर्ण, स्वतंत्र व निर्विवाद मालक झालेले आहेत, करीता सदर मिळकतीचा लिहून घेणार यांनी त्यांचे मर्जीप्रमाणे पुत्रपौत्रादी, वंशपरंपरेने उत्पन्न घेऊन निरंतर वंशोपभोग्य हस्तांतरणीय मालकी हक्काने उपभोग व फायदा घ्यावा अगर मर्जीनुरूप वहीवाट, विल्हेवाट करावी. लिहून घेणार यांचे वहीवाटीस, विल्हेवाटीस लिहून देणार अथवा त्यांचे वारसदार/उत्तराधिकारी यांनी आक्षेप, हरकत केल्यास व त्यामुळे लिहून घेणार यांचे नुकसान झाल्यांस अशा आक्षेपांचे निवारण व होणा-या नुकसानाची भरपाई लिहून देणार आपले पदरखर्चाने करून देतील.

करीता लिहुन देणार व लिहून घेणार यांनी स्वतःकरीता आणि त्यांचे वारसदार, हितचिंतक, उत्तराधिकारी व इतर संबंधित यांचेकरीता सदरील विक्रीपत्र लिहून ठेवले असून त्यांनी कुठलाही नशापाणी न करता, सद्सद्विवेक बुध्दीने विचार करून व हा विक्रीपत्राचा लेख संपुर्णतः वाचून व समजावून घेऊन यावर दोन साक्षदारासमक्ष नागपुर येथे सही व अंगठा केलेला आहे. हे विक्रीपत्र लिहून देणार, लिहून घेणार तसेच त्यांचे वारस, हक्कदार, कायदेशिर प्रतिनीधी व सर्व संबंधितांना बंधनकारक आहे आणि लागु राहील. **दिनांक – 27/10/2025.**

विक्रीपत्र लिहून देणार



१. ( श्री उदय रामराव रिंगे )



Mrs. Bharti Ringe

२. ( सौ. भारती उदय रिंगे )

नगन – १०
१०३०६ / २०२५
८ / २६

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR NAGPUR NO.10
सह दुय्यम निबंधक नागपूर क्र. १०





विक्रीपत्र लिहून घेणार

१. ( डॉ. मुकींदा शंकरराव जोगेकर )





२. ( डॉ. अलका मुकींदा जोगेकर )

साक्षीदार :

1) (Sandeep Dharmadhikari)





2) VBorkar





Drafted by - SAMiR (For NISSAM PROPERTY SOLUTIONS) as per the instructions given and documents provided. Mobile No. 9823261774.

नगन-१०

१०३०६/२०२४

१०/२६

